## ठळक बातम्या

- लोकसभा निवडणूकीच्या चौथ्या टप्प्याचा प्रचार शिगेला, राज्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आज तीन सभा, संविधान आणि आरक्षणाला धक्का लागू देणार नाही अशी सोलापूरच्या सभेत मोदी यांची ग्वाही

- सरकार हुकूमशाहीच्या दिशेनं चाललं असल्याची शरद पवार यांची टीका

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी मागं घेण्याची मुदत संपली, पुढच्या टप्प्यासाठी अनेक महत्त्वाच्या उमेदवारांचे अर्ज आज दाखल

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ९४१ अंकांची वाढ

**<><><><><>**

लोकसभा निवडणूकीच्या चौथ्या टप्प्याचा प्रचार शिगेला पोहचला आहे. सर्वच पक्षांचे महत्त्वाचे नेते आपापल्या उमेदवारांसाठी झंझावाती प्रचार दौरे करत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सोलापूर, सातारा आणि पुण्यात प्रचारसभा घेतल्या. संविधान आणि आरक्षण काढून घेण्याचा अपप्रचार काँग्रेस करत असून संविधान आणि आरक्षणाला धक्का लागू देणार नाही असं प्रतिपादन त्यांनी सोलापूरमध्ये केलं. मागासवर्गीय,

तसंच दलित आणि ओबीसींना काँग्रेसनं विकासापासून दूर ठेवल्याची टीका त्यांनी केली. इंडीया आघाडीत नेतृत्वाबाबत भांडण सुरू असून काँग्रेसकडे कोणतही ध्येय नसल्याचं ते म्हणाले. देशातल्या गरीब मुलांना डॉकटर आणि इंजिनियर बनवायचं आहे, त्यासाठी आता वैद्यकीय आणि आभियांत्रिकी शिक्षण मराठीतून देणार असल्याचं त्यांनी सांगितलं. सरकारनं ओबीसी वर्गाला संविधानिक दर्जा दिला असून त्यांच्या उन्नतीचे निर्णय घेतले असल्याचं ते म्हणाले. सातारा मतदारसंघात कराड इथं मोदी यांनी सभा घेतली. एनडीए सरकारनं जनतेशी संपर्क साधण्यासाठी आणि सरकारच्या कल्याणकारी विविध योजनांचा अभिप्राय मिळवण्यासाठी समाज माध्यमांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर केला असल्याचं ते म्हणाले. आरक्षणाच्या नावावर खोट बोलून विरोधक जनतेला फसवत असून त्यासाठी ते समाज माध्यमांवर खोटे व्हिडिओ पसरवत असल्याची टीका त्यांनी केली. काँग्रेसनं ४० वर्षांहून अधिक काळ माजी सैनिकांची वन रँक वन पेन्शन रखडवत ठेवली. एनडीए सरकारने हा प्रश्न निकाली काढत आत्तापर्यंत १ लाख कोटी माजी सैनिक आणि त्याच्या परिवाराला दिले असल्याचं त्यांनी म्हटलं. छत्रपती शिवाजी महाराजांचे सुशासन एनडीए सरकार संपूर्ण देशात राबवत असल्याचं मोदी म्हणाले. ते उद्या माळशिरस, धाराशिव आणि लातूर इथं प्रचारसभा घेणार आहेत.

**<><><><><>**

सरकार हुकूमशाहीच्या दिशेनं चाललं असून त्याला आत्ताच आवर घालण्याची, लोकशाहीच्या भवितव्यासाठी लढा देण्याची गरज आहे, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते बारामती लोकसभा मतदार संघात सासवड इथं महाविकास आघाडीच्या मेळाव्यात बोलत होते. दोन वर्षांपासून नगरपालिका जिल्हा, परिषदा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका झाल्या नाहीत. त्यामुळे येत्या काळात सरकार विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणूका होऊ देईल का याबद्दल शंका वाटते, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातला उमेदवारी मागं घेण्याची मुदत आज संपली. या टप्प्यात देशभरातल्या ९६ मतदारसंघांचा समावेश असून येत्या १३ मे रोजी तिथे मतदान होणार आहे. महाराष्ट्रात ११ ठिकाणी मतदान होणार असून त्यात नंदुरबार,जळगाव,रावेर, बीड,जालना, औरंगाबाद, पुणे, मावळ, शिरूर अहमदनगर, आणि शिर्डी यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पुढच्या टप्प्यासाठी अनेक महत्त्वाच्या उमेदवारांनी आज शक्तिप्रदर्शन करत आपापली नामनिर्देशनपत्रं दाखल केली.

या टप्प्यात राज्यातल्या **धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे** आणि मुंबईतल्या सहा मतदारसंघांचा समावेश असून, तीन मे पर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत.

महाविकास आघाडीकडून दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघातून अरविंद सावंत, दक्षिण-मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून अनिल देसाई तसंच ठाणे लोकसभा मतदारसंघातून राजन विचारे, दिंडोरीतून भास्कर भगरे आणि नाशिकमधून राजाभाऊ वाजे यांनी आज अर्ज दाखल केले.

महायुतीकडून दक्षिण मध्य मुंबईतून राहुल शेवाळे, धुळे लोकसभा मतदारसंघातून डॉ. सुभाष भामरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तसंच ठाण्यातून ओबीसी जनमोर्चाचे मल्लिकार्जून सायबन्ना पुजारे आणि धुळ्यातून अपक्ष उमेदवार लहानु महादु साबळे यांनीही अर्ज दाखल केले. दरम्यान, नाशिकमधून अपक्ष उमेदवार शांतीगिरी महाराज यांनी आज पुन्हा शक्तीप्रदर्शन करत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेकडून उमेदवारी अर्ज दाखल केला. नाशिकमधून महायुतीच्या उमेदवाराची घोषणा अद्याप झालेली नाही. त्यामुळे त्यांना पक्षाचा अधिकृत एबी फॉर्म ३ मे पर्यंत देण्याची मुदत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली आहे. याशिवाय जयश्री पाटील आणि देवीदास सरकटे यांनीही नाशिकमधून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण औरंगाबाद लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

जागतिक बाजारातले सकारात्मक कल लक्षात घेऊन, देशातल्या शेअर बाजारांमधे गुंतवणुकदारांनी आज समभागांची जोरदार खरेदी केली. त्यामुळे, मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ९४१ अंकांची वाढ झाली आणि ७४ हजार ६७१ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २२३ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ६४३ अंकांवर बंद झाला. बँकिंग आणि वित्तीय सेवा क्षेत्रातले समभाग आज तेजीत राहिले.

**<><><><><>**

गडचिरोलीमध्ये आयपीएल स्पर्धांवर ऑनलाईन सट्टा लावणाऱ्या अड्ड्यांविरोधात अहेरी पोलिसांनी आज छापा टाकला. याप्रकरणी १० जणांना अटक केली असून त्यांच्या जवळून ४ मोबाईल फोन आणि सुमारे साडे नऊ हजार रुपयांची रोकड जप्त केली.

**<><><><><>**

यवतमाळ शहरालगतच्या जामवाडी घाट मार्गावर पुलगाव इथून हरसूल इथं जाणारा डिझेलचा टँकर उलटल्यानं लागलेल्या आगीत एक जणांचा मृत्यू झाला आहे. यावेळी डिझेल रस्त्यावर सांडल्यामुळं आग भडकल्यानं दारव्हा

मार्गावरील वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली होती. अग्निशमन दलानं पाण्याचा मारा करून ही आग आटोक्यात आणली आहे.

**<><><><><>**

निवडणूक आयोगानं लोकसभा निवडणूक २०२४ च्या सहाव्या टप्प्याची अधिसूचना जारी केली आहे. या टप्प्यात सहा राज्यं आणि एक केंद्रशासित प्रदेश अश्या  लोकसभेच्या ५७ जागांसाठी  मतदान होणार आहे.

**<><><><><>**

उत्तर मध्य मुंबई मतदारसंघातून वर्षा गायकवाड यांना उमेदवारी देण्याचा निर्णय सर्वस्वी काँग्रेस पक्षाचा असून त्यात शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा हस्तक्षेप नसल्याचं खासदार संजय राऊत यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज नाशिकमध्ये वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><><>**

अहमदनगर जिल्ह्यात श्रीरामपूर तालुक्यातल्या टाकळीभान इथं निवडणूक भरारी पथकाने एका चारचाकीतून एक लाख एकोणीस हजार रुपयांची रक्कम हस्तगत केली. नेवाश्यावरुन श्रीरामपूरकडे येणाऱ्या गाड्यांची तपासणी करत असताना ही रक्कम आढळली.  शिर्डी लोकसभेचे निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहायक निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई झाली.

**<><><><><>**

नाशिक लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक खर्च निरिक्षक सागर श्रीवास्तव यांनी मतदारसंघातल्या वाहतूक तपासणी नाक्यांना अचानक भेटी दिल्या. वाहनात पन्नास हजारापेक्षा आधिक रोख रक्कम आढळल्यास सहाय्यक खर्च निरिक्षकांना तातडीने माहिती देण्याच्या सूचना त्यांनी संबधित अधिकाऱ्यांना केल्या.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी तर मराठवाड्यात काही ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान सोलापूर इथं, ४३ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. येत्या दोन दिवसात, कोकणात उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहिल.

**<><><><><>**

मध्यरेल्वेच्या हार्बर मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज स्थानकाजवळ एका उपनगरी गाडीचा डबा आज रुळावरून घसरला. सकाळी साडे अकराच्या सुमारास हा प्रकार घडला. यात कोणालाही  इजा झाली नाही. मात्र, यामुळे हार्बर मार्गावरच्या उपनगरी सेवेवर परिणाम झाला.

**//<><><><><>//**